# Greenlawns School, Worli

**सहामाही परीक्षा (प्रथम सत्र २५-२६)**

**मराठी**

**इयत्ता :- सहावी** | **पूर्णांक:- ८०**

**दिनांक :- ०८.०९.२०२५** | **वेळ –२ तास**

**सूचना :- सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.**

**शुद्ध भाषा व सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.**

---

**प्रश्न १) खालील पैकी एका विषयावर निबंध लिहा :-. (१०)**

१. सुट्टीचा दिवस

२. माझा आवडता सण

३. खरा मित्र

**प्रश्न २) खालील मुद्द्यांच्या आधारे गोष्ट तयार करून शीर्षक द्या :- (७)**

मुद्दे: गावात सर्कस --- वेगवेगळे प्राणी ---- हत्तीचे स्नानाला (अंघोळीला) नदीवर जाणे ----- रस्त्यावर शिंप्याचे दुकान ----- हत्तीचे दुकानाजवळ थांबणे ---- फळ खावू घालणे--- हत्तीने सलाम करणे -- शिंप्याने खोडी करणे–सोंडेला सुई टोचणे----वाटेतील डबक्यातले घाणेरडे पाणी--- शिंप्यावर उडवणे -- तात्पर्य.

**प्र. ३ खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

सदूचे वडील स्वातंत्र्यसैनिक होते. त्याच्या घरातले वळण चांगले होते. वडील गेल्यामुळे घरी तशी गरिबीच. पण हृदयाची श्रीमंती सर्वच माणसांत होती. सदू शाळेत एक हुशार विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होता, तसाच नम्र.

चित्रकलेच्या स्पर्धा एका समितीने जाहीर केल्या होत्या. सदू सुंदर चित्र काढी. त्याने स्पर्धेसाठी नाव नोंदवले. स्पर्धा तालुक्याच्या ठिकाणी सकाळी ११ वाजता होत्या. सदू स्पर्धेसाठी तालुक्यात गेला. चित्रकलेचे इतर साहित्य त्याने घेतले होते. मित्रांसह तो पेन्सिल विकत घेण्यास एका दुकानात गेला. एकदम 5-6 मुले सकाळीच आलेली पाहून दुकानदार खूश झाला. त्यांचे खेडवळ गणवेश पाहून त्याला हसू आले.

सदूने दुकानदाराला चांगल्या प्रतीची ड्राइंग पेन्सिल दाखविण्यास सांगितले. दुकानदाराने एक जर्मनी व इंग्लंडमध्ये तयार झालेली पेन्सिल दाखवली. सदूने विचारले, "तुम्ही देशी चांगल्या प्रतीच्या पेन्सिली ठेवत नाही का?" हो; हो, ठेवतो तर. पण त्या महाग आहेत. तुला चांगली पेन्सिल हवी व स्वस्त हवी म्हणून ही पेन्सिल दाखवली.

'सदू जर्मन पेन्सिल घे. स्वस्त अन् मस्त', मित्र म्हणाले.' आपल्या देशातील पेन्सिलच थोडी महाग असली तरी मी घेणार'. खेडवळ गणवेशातील सदू म्हणाला.' बाळ, ही चांगली पेन्सिल तुला भेट म्हणून घेऊन जा. अन् परीक्षेत यश मिळव'. दुकानदार म्हणाला.

**प्रश्न :**

१. सदू हा शाळेतला कसा विद्यार्थी होता ? (२)

२. दुकानदार खूश का झाला व त्याला का हसू आले ? (२)

३. स्पर्धा कशाची ,कोठे व किती वाजता होत्या ? (२)

४. सदूने दुकानदाराला काय दाखवण्यास सांगितले व त्याने कोणत्या देशातल्या पेन्सिली दाखवल्या ? (२)

५. वाक्य बनवा : चित्रे, पेन्सिल (२)

## व्याकरण - विभाग

**प्रश्न ४) अ) समानार्थी शब्द लिहा :-** (२)

१. अवघड २. भक्ष्य

**आ ) विरुद्धार्थी शब्द लिहा :-.** (२)

१. राग २. जुनाट

**इ) लिंग बदला :-** (२)

१. कावळा २. नायक

**ई) वचन बदला :-.** (२)

१. बाटली २. कारखाना

**उ) खालील संख्या अक्षरात लिहा.** (२)

१. ३४ - २. ४९ -

**ऊ) आज कोणता दिवस आहे ?** (१)

**ए) खालील वाक्यात नाम ओळखा :-** (१)

१. अजय खूप आनंदी आहे.

**ऐ) खालील वाक्यात सर्वनाम ओळखा :-** (१)

१. मी मुंबईला जाईन.

## साहित्य - विभाग ( अंक – ४० )

**प्रश्न ५ ) अ) खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :-** (९)

१. लेखिकेने नदीचे वर्णन कसे केले ?

२. 'मुक्या प्राण्यांची कैफियत' या पाठातून कोणता संदेश दिला आहे ?

३. नागोबाची तक्रार कोणती आहे ?

**आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :-** (३)

१. खडकावर फुललेल्या फुलांचे रंग कोणते होते ?

२. चिमणीला कशाची भीती वाटते ?

३. मिनू मासोळी कुठे राहायची?

**इ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :-** (४)

१. माणूस ------------- गाई चारायला घेऊन गेला होता.

२. एक दिवस ---------- पाऊस पडू लागला.

३. तो आठ हात असलेला --------- मासा.

४. इथं या दोन शिंपल्यांच्या पेटीत एक -------- बसलेला असतो बरं का !

**ई) कोण -कोणास म्हणाले :-** (४)

१. " घाबरू नकोस, हा तर खेकडा !"

२. " मला माहीत नाही बाळ."

३. " काय करू सुचतच नाही ! भीती फार वाटते बाई."

४. " तडफडशील मग अन्नविना, तेव्हाच होईल आमचे स्मरण."

**उ) कोण ते सांगा:-** (२)

१. माणसावर झडप घालणारे -

२. दूषणे देणारी -

**ऊ) शब्दार्थ लिहा :-** (३)

१. कासावीस होणे-

a. दुखणे b. व्याकुल होणे c. वयाकूळ होणे d. व्याकूळ होणे

P.T.O.

२. डोळे विस्फारणे -

a. डोळे बंद करणे    b. डोळे मोठे करणे    c. डोळे उघडणे    d. डोळे साफ करण

३. ऱ्हास -

a. आस    b. वास    c. नष्ट    d. कष्ट

## कविता – विभाग

प्रश्न ६) अ) खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:- (४)

१. होळीच्या वेळी झोळी कशाने भरावी?

२. कवीच्या मताप्रमाणे होळी साजरी केल्यास त्याचा घरी कोण पाणी भरेल ?

३. 'होळी आली होळी' या कवितेच्या कवीचे नाव लिहा.

४. होळीसाठी मोळी कशाची बांधावी ?

आ ) एक ते दोन शब्दांत उत्तरे लिहा :- (२)

१. होळीला करायचा गोड पदार्थ -

२. केरकचरा टाकायचे ठिकाण -

इ) खालील दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करा:- (४)

होळीचा ---------------------

-----------------------------

----------------------------

------------------------------ भरील.

ई) खालील दिलेल्या शब्दांचे यमक जुळणारे शब्द लिहा:- (३)

१. होळी -    २. नका -    ३. बंडी -

उ)योग्य शब्दार्थ निवडून लिहा :-. (२)

१. अनिष्ट -

a. वाइट    b.वाईट    c.वाईत    d. शिष्ट

२. आण -

a. वस्त्र    b.सण    c. शपथ    d. वस्तू

-----------×समाप्त ×----------------